# शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती योजना

| क्र. | योजना | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | **शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती योजना** |
| २ | योजने बद्दलचा शासन निर्णय | क्रीडा व समाजकल्याण विभाग, शा.नि. क्र. एससीएच/१४७०/१०७५७२-एस, दिनांक १४ मे, १९७१. |
| ३ | योजनेचा प्रकार/स्वरुप | सदर योजनेसाठी शासकीय विद्यानिकेतन पुसेगांव, अमरावती, औरंगाबाद व धुळे यांचेकरिता प्रत्येकी २० प्रमाणे एकूण एकूण ८० संच मंजूर आहे. |
| ४ | योजनेचा उद्देश | राज्यातील शासकीय विद्यानिकेतनमधून शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी) उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी दिली जाते. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी ही योजना लागू आहे. |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. शासकीय विद्यानिकेतन पुसेगांव, अमरावती, औरंगाबाद व धुळे यांचेमधून शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी) उत्तीर्ण झालेलेच विद्यार्थी सदर योजनेचा अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीस्तव अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस शालांत प्रमाणपत्र परीक्षेत (१० वी) किमान ६० टक्के गुण प्राप्त असणे आवश्यक आहे.<br>३. विद्यार्थ्याने सदर योजनेचा अर्ज त्याने ज्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे, त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना ३० सप्टेंबर पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | १. शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी) उत्तीर्ण प्रमाणपत्राची छायांकित प्रत.<br>२. बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.<br>३. शासकीय विद्यानिकेतद्वारे प्राप्त इन्टायटलमेंट कार्ड.<br>४. कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेबाबतचे बोनाफाईड प्रमाणपत्र. |
| ८ | दिल्या जाणाया लाभाचे स्वरुप | नवीन मंजूरीस्तव अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस शा.नि.०५.०२.२००४ प्रमाणे प्रति माह १०० प्रमाणे रक्कम रु. १०००/- तथापि, नुतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रति माह १०० प्रमाणे रक्कम रु. १२००/- (योजनेच्या नवीन मंजूरीची कार्यवाही उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे करण्यात येते व नुतनीकरण महाविद्यालयाशी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत करण्यात येते.) |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | उच्च शिक्षण संचालनालयामार्फत त्यांचे अधिनस्त सर्व महाविद्यालयास माहे जुलै मध्ये परिपत्रकाद्वारे सदर योजनेचा माहिती, अर्ज करण्याची प्रक्रिया/अर्जाचा नमुना पाठविण्यात येतो. विद्यार्थ्यांनी त्यांचा अर्ज ऑफलाईन पध्दतीने आवश्यक सहपत्रांसह विद्यापीठांमार्फत उच्च शिक्षण संचालनालयास ३० सप्टेंबर पुर्वी सादर करणे आवश्यक आहे. (विद्यार्थ्यांना सदर योजनेची माहिती व योजनेचा अर्ज संबंधित विद्यानिकेतनद्वारे देखील उपलब्ध करुन देण्यात येतो.) |
| १० | अंदाजे प्रक्रियेला लागणारा वेळ | अर्ज भरण्याची प्रक्रिया साधारणपणे माहे जुलै मध्ये सुरु होते. सदर अर्जाची विविध स्तरांवरील छाननी होऊन शिष्यवृत्तीची रक्कम माहे फेब्रुवारी - मार्च मध्ये विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेद्वारे महाविद्यालयास/विद्यार्थ्यांस वितरीत होते.<br>(कालावधी : ऑगस्ट ते मार्च – ८ ते ९ महिने) |
| ११ | संपर्क कार्यालयाचे नाव व पत्ता | उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, ससून सर्वोपचार रुग्णालयाजवळ, पुणे स्टेशन, पुणे -४११ ००१. |